सार्वजनिक बांधकाम विभागातील अधीक्षक अभियंता (विद्युत) या संवर्गाची दि.०१/०१/२०२५ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- ज्येष्ठता २०२५/प्र.क्र.२५/प्रशासन-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २९ मे, २०२५.

वाचा :- सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक समक्रमांक, दि.२५ मार्च, २०२५.

शासन परिपत्रक :-

सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना, दि.२१/०६/२०21 मधील परिशिष्ट-तीन व शासन परिपत्रक, दि.१३/०७/२०२१ मधील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागातील अधीक्षक अभियंता (विद्युत) या संवर्गाची दि.०१/०१/२०२५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता सूची दि.२५/०३/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर ज्येष्ठता सूचीत अंर्तभूत केलेल्या अधीक्षक अभियंता (विद्युत) या संवर्गातील अभियंत्यांच्या तपशिलामध्ये जसे नाव, जन्मदिनांक, नियुक्तीचा दिनांक, जात प्रवर्ग व ज्येष्ठतेचे स्थान इत्यादीबाबत काही चुका/त्रुटी आढळल्यास हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या योग्य पुराव्यासह आपली निवेदने /हरकती/सूचना शासनास सादर करण्याबाबत तरतुद नमुद करण्या आली होती. त्याअनुषंगाने उक्त ज्येष्ठतासूची संदर्भात कोणत्याही त्रुटी/ निवेदने/ हरकती /सुचना शासनास प्राप्त झाल्या नाहीत.

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित असून सदर याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून अधीक्षक अभियंता (विद्युत) या संवर्गाची दि.०१/०१/२०२५ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची या परिपत्रकाव्दारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई , पुणे, नागपूर, नांदेड, छत्रपती संभाजीनगर यांना विनंती करण्यात येते की, सदर ज्येष्ठतासूची आपल्या अधिपत्याखालील अधीक्षक अभियंता (विद्युत), यांना वितरीत करावी व त्याबाबतची पोच शासनास सादर करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२५०५२९१५३८४१३७१८ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RANJIT SHIVAJIRAO AHIRE

Digitally signed by RANJIT SHIVAJIRAO AHIRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT,
2.5.4.20=1abde6c83c28d6dbd9f52f359ea16d2e960f16f7ca457601da7303357626d5f5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7695265D501491899F1C290C5FAC1C7252F8D5F4D75CE48B86577435F1F4D615, cn=RANJIT SHIVAJIRAO AHIRE
Date: 2025.05.29 15:41:34 +05'30'

(रणजित अहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजी नगर/ नागपूर/नांदेड.

२) अधीक्षक अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजी नगर/ नागपूर/नांदेड.

३) अपर मुख्य सचिव (सा.बां.) / सचिव (रस्ते) / सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

४) निवडनस्ती.

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठता -२०२५/प्र.क्र.२५/प्रशासन-१, दि.२९ मे, २०२५									
संवर्गाचे नाव —अधीक्षक अभियंता (विद्युत)									
वेतनश्रेणी : एस-२५: ७८८००-२०९२००									
दिनांक १ जानेवारी २०२५ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची (दिनांक ०१.०१.२०२४ ते ३१.१२.२०२४ या कालावधीत कार्यरत अभियंत्यांची)									
जेष्ठता क्रमांक	शासकीय कर्मचाऱ्याचे नाव	संबंधित पदावरील नियुक्तीचा मार्ग	जन्म दिनांक	प्रवर्ग	नियम ३(२)(अ)नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक	ज्येष्ठतेचा दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक	शैक्षणिक अर्हता	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१	श्रीमती समिधा सदाशिव सुरवसे	पदोन्नती	०९-०१-१९७१	अ.जा.	२०-०७-२०२१	१९-०७-२०२१	३१-०१-२०२९	बी.ई.(इ)	
२	श्री.आवासाहेब बापुराव चौगुले	पदोन्नती	०१-०६-१९७२	भ.ज.(क)	१९-०७-२०२१	१९-०७-२०२१	३१-०५-२०३०	बी.ई.(इ)	
३	श्री.रत्नाकर शिवाजी पाटील	पदोन्नती	०५-११-१९७१	खुला	१९-०७-२०२१	१९-०७-२०२१	३०-११-२०२९	बी.ई.(इ)	
४	श्री.हेमंत हिरामण पाटील	पदोन्नती	२७-०१-१९७५	खुला	०९-०५-२०२३	०९-०५-२०२३	३१-०१-२०३३	बी.ई.(इ)	
५	श्री.दयानंद पुरभाजी बहात्रे	पदोन्नती	०८-०५-१९७६	अ.जा.	१०-०५-२०२३	१०-०५-२०२३	३१-०५-२०३४	बी.ई.(इ)	

RANJIT
SHIVAJIRAO AHIRE

Digitally signed by RANJIT SHIVAJIRAO AHIRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT,
2.5.4.20=1abde6c83c28d6dbd9f52f359ea16d2e960f16f7ca457601da7303357626d5f5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7695265D501491899F1C290C5FAC1C7252F8D5F4D75CE48B86577435F1F4D615, cn=RANJIT SHIVAJIRAO AHIRE
Date: 2025.05.29 15:41:55 +05'30'